K. C. E. Society's
# Moolji Jaitha College
An 'Autonomous College' Affiliated to
K.B.C. North Maharashtra University, Jalgaon.

NAAC Reaccredited Grade - A (CGPA : 3.15 - 3rd Cycle)
UGC honoured "College of Excellence" (2014-2019)
DST(FIST) Assisted College

KNOWLEDGE IS POWER
ESTD. 1945

के. सी. ई. सोसायटीचे
# मूळजी जेठा महाविद्यालय
क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित
'स्वायत्त महाविद्यालय'
नॅकद्वारा पुनर्मानांकित श्रेणी - 'ए' (सी.जी.पी.ए. ३.१५ - तिसरी फेरी)
विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारा घोषित 'कॉलेज ऑफ एक्सलन्स' (२०१४-२०१९)
डी.एस.टी. (फिस्ट) अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त

दि. 4/8/2022

जा.क्र.

## सूचना

सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगावद्वारा प्राप्त परिपत्रकानुसार दि. 11 व 12 ऑगस्ट 2022 रोजी ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन रोजगार मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी सोबत जोडलेल्या कागदपत्रांनुसार कार्यवाही करावी.

(प्रा. सं. ना. भारंबे)
प्राचार्य

महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
शासकीय तांत्रिक विद्यालय आवार, जी.एस.ग्राउंड जवळ,
जळगाव-४२५००१ दूरध्वनी फॅक्स : ०२५७ -२९५९७९०
ई-मेल : asstdiremp.jalgaon@ese.maharashtra.gov.in
संकेतस्थळ : www.mahaswayam.gon.in

क्र.२६/जिकौविरोउमाकेज/मेळावे/ २१ २२-२८/२०२२ दिनांक - ०४/०८/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य,

एम. जे. कॉलेज, जळगाव.

विषयः- विषयः- दि. ११ व १२ ऑगस्ट २०२२ या कालावधीत आयोजित पंडीत दिनदयाल उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुरोधाने या कार्यालयामार्फत **दि. ११ व १२ ऑगस्ट २०२२** या कालावधीत ऑनलाईन रोजगार मेळावा आयोजित करण्यांत आलेला आहे. सबब, आयोजित केलेल्या **मेळाव्याची नोटीस** नोटीस बोर्ड वर लावण्यांत यावी. **रोजगार मेळाव्यांत सहभागी होण्यासाठी ( ॲप्लाय करण्यासाठी ) सेवायोजन कार्यालयांत नांव नोंदणी केलेल्या उमेदवारांनी खालील पध्दत अवलंबवावी**

प्रथमतः या विभागाच्या https://www.rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील Employment-Job Seeker (Find a Job)-Jobseeker Login मध्ये Registration No./ID ( नोंदणी क्रमांक ) व पासवर्ड टाकून Login वर क्लिक करावे. त्यानंतर आपल्या नोंदणीच्या माहितीतील दिसणा-या Pandit Dindayal Upadhyay Job Fair वर क्लिक करुन वेबपोर्टलवर दिसणा-या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील जळगाव जिल्हा निवडून त्यातील Action View Details या ऑप्शनमध्ये रोजगार मेळाव्याची माहिती पहावी व Vacancy Listing मध्ये रिक्तपदांची माहिती पाहून Apply या ऑप्शनवर क्लिक करावे. म्हणजे आपला रोजगार मेळाव्यातील सहभाग पूर्ण होतो.आणि आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्याचा संधीचा उमेदवारांना लाभ घेता येईल.

सबब, आपल्या प्रशिक्षण संस्थेच्या नोटीस बोर्डावर व इतर मार्गाने मेळाव्याची जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी. आणि उमेदवारांना रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी (ॲप्लाय) करण्यासाठी प्रोत्साहित करावेत हि विनंती.

आपले बहुमूल्य सहकार्याचे अपेक्षेत.

आपला,

(वि.ना.मुकणे)
सहायक आयुक्त,
कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता,
जळगाव

मू.जे. महाविद्यालय
जळगाव
03 AUG 2022
203

# नोटीस बोर्ड

जिल्हयातील उमेदवारांची नांव नोंदणी सन २०१३ पासून विभागाच्या www.mahaswayam.gov.in संकेतस्थळावार सुरु झालेली आहे. उमेदवार विभागांच्या संकेतस्थळावर जाऊन ऑन लाईन नांव नोंदणी करीतच आहेत. उमेदवारांनी ऑन लाईन नांव नोंदणी केल्यानंतर उमेदवारांना मिळालेल्या युझर आयडी व पासवर्डच्या अनुषंगाने विभागांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या सुविधांचा आणि माहितीचा उमेदवारांना लाभ घेता येतो.

याच अनुषगांने अल्पसंख्यांक उमेदवाराना देखील रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी व सुविधाचा लाभ मिळणे करीता जास्तीत जास्त **अल्पसंख्यांक उमेदवारानी ऑनलाईन नांव नोंदणी करणे अपेक्षीत आहे.** कार्यालयात येणा-या उमेदवारांना देखील नांव नोंदणी करण्यांबाबत मार्गदर्शन व सहाय्य या कार्यलया कडून करण्यांत येते. कोविड-१९च्या प्रादूर्भावामूळे सदयास्तीत रोजगाराच्या संधी पूरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. तथापी या कार्यालया मार्फत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी वेळोवेळी घेण्यांत येणा-या **ऑन लाईन रोजगार मेळाव्याचा** लाभ घेण्यांत यावा तसेच **अल्पसंख्याक उमेदवाराणी देखील आयोजीत करण्यांत आलेल्या मेळाव्याचा लाभ घेण्यांचे** आव्हाण **मा. सहायक आयुक्त, श्री.वि.जा.मुकणे, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता, मार्गदर्शन केंद्र जळगांव** यांनी कळविलेले आहे. याबाबत काही अडचण असल्यास कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी ९.४५ ते संध्या.६.१५) या वेळेत कार्यालयाशी कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२५७-२९५९७९० वर संपर्क साधावा.

दिनांक-११/०८/२०२२ ते १२/०८/२०२२

**स्थळ – जळगांव**

सहायक आयुक्त,
कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता,
जळगांव